जनसंपर्क कक्ष

30 JUN 2025 तरुण भारत

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांना रोटरी क्लब ऑफ करवीर यांचा 'करवीर भूषण पुरस्कार प्रदान करताना राजूभाई दोशी. सोबत क्लबचे पदाधिकारी व सदस्य.

# कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांना करवीर भूषण पुरस्कार

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव तथा विज्ञान लेखक डॉ. विलास शिंदे यांना रोटरी क्लब ऑफ करवीर यांच्या वतीने नुकताच 'करवीर भूषण' पुरस्कार प्रदान करण्यात आला. रोटरी क्लब ऑफ करवीर यांच्या वतीने रेसिडेन्सी क्लब येथे ३६ व्या चार्टर नाईट सोहळा झाला.

यावेळी क्लबचा करवीर भूषण हा प्रतिष्ठेचा पुरस्कार कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांना राजूभाई दोशी यांच्या हस्ते शाल, श्रीफळ, सन्मानपत्र व स्मृतिचिन्ह देऊन पुरस्कार प्रदान करण्यात आला.

डॉ. विलास शिंदे यांनी पुरस्काराबद्दल रोटरी क्लब ऑफ करवीरचे आभार मानले. क्लबचे असिस्टंट गव्हर्नर गिरीश जोशी यांनी क्लबने वर्षभर विविध केलेल्या कार्याचा उल्लेख केला. प्रमुख पाहुणे राजूभाई दोशी यांनी भविष्यात क्लबमार्फत एखादा समाजोपयोगी कायमस्वरुपी भरीव प्रकल्प उभा करण्यासंदर्भात विचारविमर्ष करावा, असे आवाहन त्यांनी केले. क्लबचे अध्यक्ष कुशल पटेल यांनी स्वागत केले. पाहुण्यांच्या हस्ते दीप प्रज्वलन करण्यात आले. त्यानंतर पर्यावरणविषयक लघुपट 'फाकड्या'चे प्रदर्शन करण्यात आले. यावेळी दिलीप शेवाळे आणि डॉ. संदीप पाटील यांनी पाहुण्याचा परिचय करून दिला. निशिकांत नलवडे यांनी सूत्रसंचालन केले, तर सेक्रेटरी नारायण भोई यांनी उपस्थितांचे आभार मानले.

कार्यक्रमास असिस्टंट गव्हर्नर गिरीश जोशी, अध्यक्ष कुशल पटेल, सेक्रेटरी नारायण भोई, खजिनदार निलेश मादुले, माजी अध्यक्ष सुभाष आलेकर, संभाजी पाटील, दिलीप शेवाळे, दिलीप प्रधाने, निशिकांत नलवडे, हरेष पटेल, उदय पाटील, संजय पाटील, उपस्थित होते.

सकाळ



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांना रोटरी क्लब ऑफ करवीर यांचा 'करवीर भूषण' पुरस्कार राजूभाई दोशी यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. यावेळी क्लबचे पदाधिकारी, सदस्य उपस्थित होते.

# कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांना 'करवीर भूषण' पुरस्कार प्रदान

कोल्हापूर, ता. २९ : शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव तथा विज्ञान लेखक डॉ. व्ही. एन. शिंदे यांना रोटरी क्लब ऑफ करवीरतर्फे रेसिडेन्सी क्लबमधील कार्यक्रमात 'करवीर भूषण' पुरस्कार प्रदान करण्यात आला. 'आज खऱ्या अर्थाने आज करवीरवासी झाल्यासारखे वाटत असल्याची भावना त्यांनी यावेळी व्यक्त केली.

येथील 'रोटरी क्लब'च्या ३६ व्या चार्टर नाईट सोहळ्यात श्री. शिंदे यांना राजूभाई दोशी यांच्या हस्ते शाल, श्रीफळ, सन्मानपत्र व स्मृतिचिन्ह देऊन पुरस्कार प्रदान केला. त्यांनी शिक्षण, प्रशासन व पर्यावरण या क्षेत्रांत केलेल्या उल्लेखनीय कार्याची दखल घेत हा सन्मान करण्यात आला.

क्लबचे असिस्टंट गव्हर्नर गिरीश जोशी यांनी क्लबने वर्षभर विविध केलेल्या , कार्याची माहिती दिली. क्लबचे अध्यक्ष कुशल पटेल यांनी स्वागत केले. उत्तम पवार यांनी निर्मिती केलेल्या पर्यावरणविषयक लघुपट 'फाकड्या'चे प्रदर्शन यावेळी करण्यात आले. यावेळी खजिनदार नीलेश भादुले, दिलीप शेवाळे, डॉ. संदीप पाटील, सुभाष आलेकर, संभाजी पाटील, दिलीप प्रधाने, निशिकांत नलवडे, हरेष पटेल, उदय पाटील, संजय पाटील, शीतल दुग्गे, पंडित जाधव, चंद्रकांत कागले उपस्थित होते. सेक्रेटरी नारायण भोई यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
30 JUN 2025 तरुण भारत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# दीक्षांत समारंभात पदवीसाठी अर्ज करण्याच्या तारखा जाहीर

## १ ते ३० जुलैपर्यंत ऑनलाईन अर्ज करण्यासाठी ५०० रूपये शुल्क

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाचा ६२ वा दीक्षात समारंभ डिसेंबर किंवा जानेवारी २०२६ मध्ये होणार आहे. या पार्श्वभूमीवर दीक्षांत समारंभात प्रत्यक्ष आणि पोस्टाने पदवी प्रमाणपत्र घेण्यासाठी ऑनलाईन अर्ज करण्याच्या तारखा विद्यापीठ प्रशासनाने जाहीर केल्या आहेत. यासंदर्भातील माहिती विद्यापीठाच्या **www.unishivaji.in** या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

शिवाजी विद्यापीठाच्या ६२ व्या दीक्षांत समारंभात प्रत्यक्ष उपस्थित राहून पदवी प्रमाणपत्र घेण्यासाठी १ ते ३० जुलै या कालावधीत ५०० रूपये शुल्क भरून अर्ज करावयाचा आहे. पोस्टाव्दारे पदवी प्रमाणपत्र घेण्यासाठी ६०० रूपये शुल्क भरून अर्ज करावयाचा आहे. प्रत्यक्ष उपस्थित राहून पदवी प्रमाणपत्र घेण्यासाठी ७०० रूपये विलंब शुल्क भरून १ ते १५ ऑगस्ट या कालावधीत अर्ज




करावयाचा आहे. पोस्टाव्दारे अर्ज घेण्यासाठी ८०० रूपये विलंब शुल्क भरून अर्ज भरावयाचा आहे. प्रत्यक्ष उपस्थित राहून पदवी प्रमाणपत्र घेण्यासाठी १७०० रूपये अतिविलंब शुल्क भरून १६ ते ३१ ऑगस्ट या कालावधीत अर्ज करावयाचा आहे. पोस्टाव्दारे अर्ज घेण्यासाठी १८०० रूपये अतिविलंब शुल्क भरून अर्ज भरावयाचा आहे.

ऑनलाईन अर्ज भरलेली प्रिंट विद्यापीठात जमा न करता विद्यार्थ्यांनी आपल्या माहितीसाठी जपून ठेवली पाहिजे. ऑनलाईन अर्ज करताना अर्जावरील माहिती बरोबर आहे की नाही याची खातरजमा करुन घ्यावी. विद्यार्थ्यांनी इंग्रजीमधील नावात किंवा अन्य काही दुरुस्ती असल्यास प्रथम संबंधित स्वायत्त महाविद्यालय व संबंधित परीक्षा विभाग यांचेशी संपर्क साधून आवश्यक ती दुरुस्ती करावी. त्यामधील माहिती अपडेट करूनच पदवी प्रमाणपत्राकरिता संबंधित ऑप्शनमधून अर्ज भरावा. मराठीमधील पूर्ण नाव व आईचे नाव बिनचूक नमूद करावे. पीएच. डी प्राप्त विद्यार्थ्यांचे दीक्षांत अर्ज मुदतीनंतर १० सप्टेंबरपर्यंत १८०० रुपये शुल्काने स्वीकारले जातील. २००२ पूर्वी उत्तीर्ण झालेल्या ज्या विद्यार्थ्यांचा फॉर्म रेग्युलर ऑप्शनमधून भरला जात नाही, त्या विद्यार्थ्यांनी फॉर्म भरण्यासंदर्भात आवश्यक कागदपत्रासहीत प्रत्यक्ष दीक्षांत विभागामध्ये संपर्क साधावा, अशी माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिह जाधव यांनी दिली.

पुढारी

# शिवाजी विद्यापीठ दीक्षान्त पदवी प्रमाणपत्र मागणी अर्ज प्रक्रिया उद्यापासून सुरू

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाचा ६२ वा दीक्षान्त समारंभ साधारणपणे डिसेंबर २०२५ ते जानेवारी २०२६ दरम्यान होणार आहे. त्या अनुषंगाने दीक्षान्त पदवी प्रमाणपत्र मागणी अर्ज प्रक्रिया १ जुलैपासून सुरू होणार आहे. ऑक्टोबर २०२४ व मार्च २०२५ सत्रातील व यापूर्वीच्या अंतिम परीक्षेमध्ये उत्तीर्ण व पात्र विद्यार्थ्यांनी पदवी, पदविका, प्रमाणपत्र मिळण्याकरिता ऑनलाईन पदवी प्रमाणपत्र मागणीसाठी दीक्षान्त अर्ज करणे आवश्यक आहे. ऑनलाईन अर्ज करताना अर्जावरील माहिती बरोबर आहे की नाही, याची खातरजमा करून घ्यावी, असे आवाहन परीक्षा व मूल्यमापन मंडळाने केले आहे.

तरूण भारत

# ब्रेल ऑडिओ बुक सांगणार राजर्षी शाहूंचा जीवनपट

प्रतिनिधी
कोल्हापूर

■ विद्यापीठाच्या शिववाणी रेडिओवरुन लोकार्पण

राजर्षी शाहू महाराज यांच्या जीवनावरील पहिल्या ब्रेलपुस्तिकेच्या ऑडिओबुकचे लोकार्पण शिवाजी विद्यापीठाच्या 'शिववाणी' या कम्युनिटी रेडिओवर करण्यात आले. राजर्षी शाहू महाराज यांच्या जयंतीनिमित्त विद्यापीठाने हा उपक्रम घेतला.

शाहू विचारांचे अभ्यासक विक्रम रेपे यांनी राजर्षी शाहू महाराज यांच्या जीवनावर आधारित पहिली ब्रेलपुस्तिका लिहिली आहे. अलिकडेच या पुस्तिकेचे प्रकाशन शिवाजी विद्यापीठात खासदार शाहू महाराज यांच्या हस्ते आणि कुलगुरु प्रा. डॉ. दिगंबर शिर्के यांच्या अध्यक्षतेखाली झाले होते. या पुस्तिकेचे शिवाजी विद्यापीठाच्या शिववाणी या कम्युनिटी रेडिओद्वारे ऑडिओबुक तयार करण्यात आले. विक्रम रेपे आणि 'शिववाणी'चे अभिषेक पाटील यांच्या आवाजात ऑडिओबुकचे रेकॉर्डिंग करण्यात आले. हे ऑडिओबुक 'शिववाणी कम्युनिटी रेडिओ' या युट्युब चॅनलवर तसेच 'स्पॉटिफाय' या ऑडिओ प्लॅटफॉर्मवर उपलब्ध आहे. या लोकार्पण कार्यक्रमास शिववाणीचे नोडल अधिकारी डॉ. शिवाजी जाधव, कल्याणी आमणगी, रोहित भारतीय आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष

30 JUN 2025 तरूण भारत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठातील ४५० विद्यार्थ्यांना रोजगार संधी

प्रतिनिधी

कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाच्या मध्यवर्ती रोजगार कक्षाने गत वर्षभरात प्रभावी कामगिरीची नोंद करीत एकूण ७४ विविध कौशल्य विकास प्रशिक्षण कार्यक्रम राबविले, त्या माध्यमातून विद्यापीठासह संलग्नित महाविद्यालयांतील ३२०० विद्यार्थ्यांना प्रशिक्षित केले. त्याच बरोबर ४५० हून अधिक विद्यार्थ्यांना नामांकित उद्योग, व्यवसायांमध्ये रोजगार संधीही उपलब्ध करून देण्यात यश प्राप्त केले आहे, अशी माहिती कक्षाचे समन्वयक डॉ. राजन पडवळ यांनी दिली.

डॉ. पडवळ म्हणाले, विद्यार्थ्यांना रोजगारक्षम बनविण्यासाठी मध्यवर्ती रोजगार कक्षाच्या माध्यमातून प्रयत्न सुरू आहे. वर्षभरात एकूण ७४ प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित केले आणि त्या माध्यमातून ३२०० विद्यार्थ्यांना प्रशिक्षित केले. या प्रशिक्षणामध्ये रिझ्युमे लिहिणे, मुलाखतीचे तंत्र, कॉर्पोरेट कल्चर आदींचा समावेश होता. यामध्ये इन्फोसिस, ॲक्सिस बँक, एन.पी.सी. आय. अदानी समूह, अमूल इंडिया, गद्रे मरिन एक्स्पोर्ट्स, टॅको आदी कंपन्यांचा समावेश आहे.

कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील आणि कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांच्यासह अधिकार मंडळांच्या सहकार्याने वर्षभर उपक्रम राबविले जातात.

पुढारी

# अभियांत्रिकीची ऑनलाईन प्रवेश अर्ज प्रक्रिया सुरू

## जिल्ह्यात ३० महाविद्यालये; १५ हजारांहून अधिक जागा

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

अभियांत्रिकी (बीई, बीटेक) प्रथम वर्ष व थेट द्वितीय वर्ष प्रवेश प्रक्रिया नावनोंदणीची प्रक्रिया सुरू झाली आहे. त्यानुसार ८ जुलैपर्यंत विद्यार्थ्यांना अर्ज करता येणार आहे.

कोल्हापूर जिल्ह्यात शिवाजी विद्यापीठ आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ संलग्न ३० महाविद्यालये आहेत. यात सुमारे १५ हजारांहून अधिक प्रवेश जागा आहेत.

नुकतीच राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्षाने (सीईटी सेल) अभियांत्रिकी प्रवेशाचे वेळापत्रक जाहीर केले आहे. त्यानुसार ऑनलाईन नावनोंदणीस प्रारंभ झाला आहे. प्रक्रियेमध्ये ऑनलाईन नाव नोंदणी, शैक्षणिक कागदपत्रे तपासणी/पडताळणी, नाव नोंदणी अर्ज कन्फर्मेशन, कागदपत्रे ऑनलाईन अपलोड करणे, महाविद्यालयांचे पसंतीक्रम अर्थात ऑप्शन फॉर्म भरणे आणि कन्फर्म करणे आदी टप्प्यांचा समावेश आहे.

- **विद्यार्थ्यांना ऑनलाईन, ऑफलाईन पद्धतीने नावनोंदणी करता येणार**
- **ई-स्क्रुटीनी, फिजिकल स्क्रुटीनी यापैकी एक पर्याय निवडता येईल**
- **यंदा केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेच्या (कॅप) चार फेऱ्या असणार**
- **फेरीमध्ये विद्यार्थ्यांना किमान एक ते कमाल ३०० महाविद्यालयांचे पर्याय भरता येणार**

**प्रवेश प्रक्रियेचे वेळापत्रक**

● ऑनलाईन नावनोंदणी, कागदपत्रे अपलोड करणे : ८ जुलैपर्यंत ● कागदपत्रे पडताळणी व कन्फर्मेशन करणे : ३० जून ते ९ जुलै ● तात्पुरती गुणवत्ता यादी प्रसिद्ध : १२ जुलै ● गुणवत्ता यादीवर हरकती, तक्रारी नोंदवणे : १३ ते १५ जुलै ● अंतिम गुणवत्ता यादी जाहीर करणे : १७ जुलै.

सकाळ

# राजर्षी शाहूंवरील ब्रेलपुस्तिकेच्या ऑडिओबुकचे लोकार्पण

कोल्हापूर : राजर्षी शाहू महाराज यांच्या जीवनावरील पहिल्या ब्रेलपुस्तिकेच्या ऑडिओबुकचे लोकार्पण शिवाजी विद्यापीठाच्या 'शिववाणी' या कम्युनिटी रेडिओवर करण्यात आले. राजर्षी शाहू महाराज यांच्या जयंतीनिमित्त विद्यापीठाने हा उपक्रम राबविला. शाहू विचारांचे अभ्यासक विक्रम रेपे यांनी राजर्षी शाहू महाराज यांच्या जीवनावर आधारित पहिली ब्रेलपुस्तिका लिहिली आहे. अलीकडेच या पुस्तिकेचे प्रकाशन शिवाजी विद्यापीठात झाले. विक्रम रेपे आणि 'शिववाणी'चे अभिषेक पाटील यांच्या आवाजात ऑडिओबुकचे रेकॉर्डिंग करण्यात आले.

पुण्यनगरी

# देशातील ८९ शिक्षण संस्था यूजीसीच्या डिफॉल्टर यादीत

## रॅगिंगरोधी मापदंडांचे पालन न केल्याचा ठपका

नवी दिल्ली : चार आयआयटी, तीन आयआयएम, एम्स यांसह देशभरात ८९ शिक्षण संस्थांना रॅगिंगरोधी मापदंडांचे पालन न केल्यामुळे विद्यापीठ अनुदान आयोगाने (यूजीसी) 'डिफॉल्टर' यादीत टाकले आहे. या संस्थांना प्रतिज्ञापत्र सादर न केल्याबद्दल कारणे दाखवा नोटीस देण्यात आली आहे.

रॅगिंगच्या मुद्द्यावरून यूजीसीने डिफॉल्टर यादीत टाकलेल्या शिक्षण संस्थांमध्ये आयआयटी मुंबई, आयआयटी खडगपूर, आयआयटी पलक्कड आणि आयआयटी हैदराबाद या भारतीय तंत्रज्ञान संस्थांचा समावेश आहे. याशिवाय व्यवस्थापन क्षेत्रातील आघाडीच्या संस्था असलेल्या आयआयएम मुंबई, आयआयएम रोहतक आणि आयआयएम तिरुचिरापल्ली यांनादेखील डिफॉल्टर यादीत टाकण्यात आले आहे. रायबरेली येथील एम्स तसेच दिल्ली, आंध्रप्रदेश व हरयाणातील राष्ट्रीय डिझाइन संस्थांचा (एनआयडी) देखील या यादीत समावेश आहे. या यादीत देशभरातील एकूण ८९ संस्था आहेत. यूजीसीने शिक्षण संस्थांमधील रॅगिंगला आळा घालण्यासाठी काही दिशानिर्देश दिले होते. मात्र, या नियमांचे पालन करण्यात आणि संबंधित अँटी रॅगिंग प्रतिज्ञापत्र सादर करण्यास या संस्था अपयशी ठरल्याचे यूजीसीचे सचिव मनीष जोशी यांनी सांगितले. यूजीसीने या संस्थांना नियमांचे पालन करण्यास ३० दिवसांची मुदत दिली आहे. त्यानंतर यूजीसीचे अनुदान आणि आर्थिक मदत परत घेतली जाईल, असा इशारा दिला आहे. रॅगिंगरोधी कायद्यान्वये प्रत्येक विद्यार्थी आणि त्यांच्या पालकांना प्रवेशावेळी आणि प्रत्येक वर्षाच्या सुरुवातीला अँटी रॅगिंग प्रतिज्ञापत्र द्यावे लागते.